


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३२१ वा सोमवार दि १६ मार्च २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बुलढाण्यात दिव्यांग तपासणीवर प्रश्नचिन्ह; पारदर्शकतेचा अभाव?

**मुंढे साहेब आपण बुलडाणा जिल्हा बोगस दिव्यांग प्रमाणपत्र धारकांची तुमच्या नियमानुसार तपासणी केली तर एवढे निश्चित महाराष्ट्रात नसेल तेवढे बोगस प्रमाणपत्र तुम्हाला बुलडाणा जिल्ह्यात दिसून येतील ही खात्री खऱ्या दिव्यांगांची आहे.**

जनसंचलन/बुलडाणा

जिल्ह्यात नुकतीच पार पडलेली दिव्यांग तपासणी प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात सापडली असून या तपासणीत पारदर्शकतेचा अभाव असल्याची चर्चा सर्वत्र रंगत आहे. अनेक लाभार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांकडून गंभीर प्रश्न उपस्थित केले जात असून, या प्रकरणात दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे कर्तव्यदक्ष सचिव मुंढे यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे. जिल्ह्यातील परिस्थिती पाहता खरा दिव्यांग खोटा ठरत आहे आणि बोगस दिव्यांग खरा ठरत आहे, अशी तीव्र भावना व्यक्त होत आहे. शासन निर्णयानुसार सर्व दिव्यांगांची तपासणी एकाच वेळी आणि पारदर्शक पद्धतीने होणे आवश्यक असताना टप्प्याटप्प्याने तपासणी का करण्यात आली,असा सवाल उपस्थित होत आहे. याशिवाय, यापूर्वी बोगस प्रमाणपत्र दिल्याच्या आरोपांमध्ये अडकलेल्यांकडूनच वस्तुनिष्ठ अहवाल कसा अपेक्षित धरला जाऊ शकतो, असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत.सर्व प्रमाणपत्रधारकांची तपासणी तटस्थ ठिकाणी जसे की मुंबईतील जे.जे. रुग्णालयासारख्या उच्चस्तरीय संस्थेत होणे गरजेचे असताना स्थानिक स्तरावरच घाईघाईने तपासणी का करण्यात आली, याबाबतही संभ्रम आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणावे, अन्यथा जिल्ह्यातील हजारो खऱ्या दिव्यांगांवर अन्याय होण्याची दाट शक्यता बुलडाणा जिल्हा परिषद प्रशासनाकडून शासनाची बनवाबनवी झालेल्या पत्र व्यवहारावरून व्यक्त केली जात आहे. बुलडाणा जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी खरात यांची पत्रकारांनी दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी व दिव्यांग प्रमाणपत्र धारक यांची तपासणी विषयी माहिती घेतली असता मागील कित्येक काळापासून विविध विभागातील भ्रष्टाचार प्रकरणात महाराष्ट्रभर गाजत असलेल्या




बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातून दिव्यांग विभागातून आतापर्यंत देण्यात आलेली दिव्यांग प्रमाणपत्र शासकीय कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांना अर्थपूर्ण प्रमाणपत्र वाटण्यात आलेली असून जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात दिव्यांग प्रमाणपत्रासाठी बसलेले खाजगी एजंट व त्या परिसरातील कॉम्पुटर मल्टी सर्विसेस व झेरॉक्स या ठिकाणाहून प्रमाणपत्रांची घेन देन सुरू असल्याची चर्चा जिल्हाभर असून अद्याप पर्यंत तिथे कोणत्याच प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही जिल्हा सामान्य रुग्णालयातील काही कर्मचारी व अधिकारी वर्षं वर्षांपासून डेपोटेशन च्या नावावर खुर्चीला लागलेली कीड सारखी चिपकून बसलेली आहे व त्यांनी पचन न होण्यासारखी चल अचल संपत्ती गोळा केल्याची चर्चाही जिल्हा सामान्य रुग्णालयात आहे

**क्रमशः**

# बुलडाण्यात घरगुती गॅस सिलिंडरचा हॉटेलमध्ये अवैध वापर

# तहसीलदार विठ्ठल कुमरे यांची धडक कारवाई!

जनसंचलन/बुलढाणा

शहरात घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत असल्याच्या तक्रारींना गांभीर्याने घेत जिल्हा प्रशासनाने मोठी धडक कारवाई सुरू केली आहे. बुलडाण्याचे तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी आज शहरातील विविध हॉटेल्स व खाद्यव्यवसायिकांवर अचानक छापे टाकत अवैध वापरावर जोरदार कारवाई केली. जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार कुमरे यांच्या पथकाने शहरातील अनेक भागांत तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेचा मुख्य उद्देश म्हणजे घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर थांबवणे आणि कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्यांवर लगाम घालणे हा होता. या कारवाईदरम्यान पथकाने जवळपास ४० हॉटेल्स व प्रतिष्ठानांची तपासणी केली. तपासणीमध्ये धक्कादायक बाब समोर आली असून, अनेक ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडरचा सर्रासपणे व्यावसायिक वापर केला जात असल्याचे आढळून आले. प्रशासनाने ११ ठिकाणी छापे टाकून एकूण १४ घरगुती गॅस सिलिंडर जप्त केले आहेत. काही हॉटेल मालकांनी कारवाईची माहिती मिळताच सिलिंडर लपवण्याचा प्रयत्न केल्याचेही पथकाच्या निदर्शनास आले. मात्र प्रशासनाच्या पथकाने सतर्कतेने कारवाई करत हे प्रकार उघडकीस आणले. या प्रकरणी संबंधित हॉटेल मालकांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर हा नियमबाह्य असून यामुळे सामान्य नागरिकांना गॅस सिलिंडर मिळण्यात अडचणी निर्माण होतात, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तहसीलदार विठ्ठल कुमरे यांच्या या धडक कारवाईमुळे शहरातील



हॉटेल चालकांमध्ये खळबळ उडाली असून अनेकांचे धाबे दणाणले आहेत. पुढील काळातही अशीच तपासणी मोहीम सुरू ठेवली जाणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

दैनिक जनसंचालन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# घाबरगुंडी आणि घसरगुंडी

इराण-अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्धात सुरू असलेली बॉम्बफ`क थांबण्याचे नाव घेत नसल्याने, जगभरातील शेअर बाजारांमध्ये रोज भूकंप होत आहेत. या युद्धस्थितीने निर्माण झालेल्या तेल आणि गॅसटंचाईने भारतातील शेअर बाजारात अब्जावधी रुपयांची गुंतवणूक भक्ष्यस्थानी पडली असून, मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक १४७० अंकांनी कोसळला, तर राष्ट्रीय शेअर बाजारात ४८८ अंकांची तीव्र घसरण झाली. त्यामुळे आणखी एक ङ्काळा शुक्रवारफपाहण्याची वेळ लाखो भारतीय गुंतवणूकदारांवर आली. गेल्या १५ महिन्यांतील ही सर्वांत मोठी पडझड ठरली आहे. युद्धकाळात इराणने होर्मुझ सामुद्रधुनीचे नाक दाबल्यानंतर जगभरातील तेल आणि गॅसपुरवठा खुंटल्याने शेअर बाजारांना हे कापरे भरले आहे. दोन दिवसांपूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या काहीशा सकारात्मक विधानांमुळे या पडझडीला थोडा लगाम बसला होता; परंतु त्यानंतर पुन्हा संघर्ष तीव्र झाला. गेल्या वर्षाअखेरीस भारतीय बाजार नवनवी शिखरे गाठत होता. यंदा नववर्षात त्याला उतार पडण्यास सुरुवात झाली. भारत आणि अमेरिकेतील व्यापारकराराची चाहूल लागल्याने काही काळ तेजीचे वातावरण निर्माण झाले खरे; पण इराण-अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्धस्थितीने पुन्हा त्यावर पाणी पडले. त्यातच इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांना अटकाव केल्याने जगभरात तेलसंकट उभे राहिले आहे. मुळातच भावनांच्या हिंदोळ्यावर झुलणाऱ्या शेअर बाजारांमध्ये या परिस्थितीचे झटके बसणार, हे उघड होते. त्यामुळे भारतीय भांडवलबाजाराचे मूल्य ५३३ अब्ज डॉलरने घसरले. अनेक लहान देशांच्या अर्थव्यवस्थेपेक्षा ही रक्कम मोठी आहे. दोन दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी युद्ध अंतिम टप्प्यातफ असल्याचे विधान केल्याने बाजार काहीसा सावरला होता; पण उलटपक्षी त्यानंतर संघर्ष तीव्र झाला आणि इराणचे नवे नेते मजतबा खामेनी यांनी होर्मुझची सामुद्रधुनी बंदच राहील, असा इशारा दिला. या साऱ्यामुळे परिस्थिती चिघळली आहे. गुरुवार आणि शुक्रवारी तर गुंतवणूकदारांचे अनुक्रमे सहा लाख कोटी रुपये आणि नऊ लाख कोटी रुपये बुडाले आहेत. युद्धस्थिती आणि विस्कळित पुरवठा साखळीने निर्माण झालेल्या इंधनटंचाईचे सर्वदूर परिणाम वाहन उद्योग आणि आनुषंगिक क्षेत्रांना भेडसावत आहेत. भारताप्रमाणेच युरोप, अमेरिकेसह जगभरातील शेअर बाजारांमध्ये हीच स्थिती आहे; त्याचे पडसाद भारतीय बाजारात उमटणे साहजिक आहे. या स्थितीत परकीय गुंतवणूकदारांनी विक्रीचा मारा केला. त्यातून सुमारे ५७ हजार कोटी रुपयांचे भांडवल बाहेर गेल्याने बाजारावर अधिकच दबाव आला आणि घसरण तीव्र झाली. इंधन दरांतील वाढीमुळे आयातीचे बिल वाढणार आणि परकीय चलनाच्या गंगाजळीवर भार आल्याने रुपयाने पुन्हा तळ गाठला आहे. भारतासारख्या देशांमध्ये शेअर बाजार हा सर्वसामान्य गुंतवणूकदारांच्या भावनांचे प्रतिनिधित्व करीत असला, तरी एकूण देशाच्या अर्थव्यवस्थेच्या मूल्यमापनाचे ते एकमेव साधन नाही, हे वास्तव सर्वांनीच विशेषत: अशा काळात लक्षात घेतले पाहिजे. त्यामध्ये सकल राष्ट्रीय उत्पन्न, महागाईचा दर, बेरोजगारी, औद्योगिक उत्पादन, व्यापारतूट आणि परकीय चलनाचे साठे अशा मूलभूत विषयांवर सतत नजर ठेवून परिस्थितीचे आकलन करून घेणे आवश्यक आहे. त्या कसोट्यांवर भारताच्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत आहे, असे जागतिक संस्थांनीही म्हटले आहे. हे मुद्दे लक्षात घेतले, तर




सध्या कोसळलेला बाजार पुन्हा सावरणार आहे, हे वास्तव समोर येते. त्यामुळेच सर्वसामान्य गुंतवणुकदारांनी या दबावामुळे घाबरून विक्री करणे अतिघाईचे ठरेल; तसेच बाजाराचा नेमका तळ न गवसल्याने अवाजवी खरेदीचाही सपाटा तोट्यात नेऊ शकतो. एकाच समभागात सर्व गुंतवणूक अडकवून ठेवण्यापेक्षा प्रमाणबद्ध विविधीकरण नेहमीच जोखीम कमी करते, हा जगभरातला अनुभव आहे. अशा जागतिक आव्हानांच्या काळात तंत्रशुद्ध अभ्यास करून आणि विश्वासू तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊनच पावले उचलण्याची गरज आहे. सध्या अनेक तज्ज्ञ गुंतवणुकदारांना संयम राखण्याचा सल्ला देत आहेत, तो विचारात घेतला पाहिजे. आर्थिक पाया भक्कम असलेल्या कंपन्यांचे समभाग निवडून, त्यात दीर्घकालीन गुंतवणूक फायद्याची ठरते; त्याप्रमाणेच पद्धतशीर गुंतवणूक योजनेचा (एसआयपी) पर्याय लाभदायक ठरतो. एकंदरीत तेजी किंवा मंदीच्या लाटेत वाहून जाण्यापेक्षा आपली गुंतवणुकीची क्षमता आणि मोबदल्याचे उद्दिष्ट निश्चित करून अडचणीच्या स्थितीतही त्याच मार्गाने धीराने वाटचाल करणे, हाच सध्याचा योग्य मार्ग आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# सकाळी उठल्यावर लगेच मोबाईल बघता?

## खराब करताय मेंदूचे थीटा, अल्फा, बिटा चक्र, उठल्यावर पहिले ६० मिनिटे करा या गोष्टी..

सकाळीउठल्यावर आपले शरीर आणि मन हळूहळू जागे होत असते. 'स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी' च्या एका संशोधनानुसार, झोपेतून उठल्यानंतरचा पहिला एक तास तुमच्या संपूर्ण दिवसाची मानसिक स्थिती (चळपवीशीं) ठरवतो. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसन च्या अहवालानुसार, उठल्याबरोबर मोबाईल पाहिल्याने मेंदूला जो 'डोपामाइन स्पाइक' मिळतो, तो नैसर्गिक नसून कृत्रिम असतो. जेव्हा तुम्ही डोळे उघडल्या उघडल्या नोटिफिकेशन, इमेल्स किंवा सोशल मीडिया पाहता, तेव्हा तुम्ही तुमच्या मेंदूला 'रिॲक्टिव्ह मोड' मध्ये टाकता. म्हणजेच, तुम्ही स्वत:च्या विचारांऐवजी इतरांच्या माहितीवर आणि प्रतिक्रियांवर तुमचा दिवस सुरू करता. ही सवय केवळ डोळ्यांना त्रास देत नाही तर ती तुमच्या सर्जनशीलता आणि मानसिक शांततेवर हळूहळू परिणाम करते.झोपेतून उठताना आपला मेंदू हळूहळू वेगवेगळ्या अवस्थांतून जातो. सुरुवातीला मेंदू डेल्टा अवस्थेतून थीटा आणि नंतर अल्फा अवस्थेत येतो. 'हार्वर्ड हेल्थ' नुसार, थीटा अवस्था म्हणजे मेंदू अजून शांत असतो आणि या वेळी नवीन कल्पना सुचणे, काहीतरी शिकणे किंवा सर्जनशील विचार करणे सोपे असते. त्यानंतर येणारी अल्फा अवस्था म्हणजे मेंदू हळूहळू जागा



होत असतो पण तरीही मन शांत आणि स्थिर असते. पण जेव्हा तुम्ही उठल्याबरोबर मोबाईल हातात घेता, तेव्हा मेंदू थेट 'हाय-बेटा' अवस्थेत पोहोचतो, जो तणाव आणि चिंतेशी संबंधित आहे. यामुळे तुम्ही तुमची नैसर्गिक विचार करण्याची प्रक्रिया गमावून बसता. त्याचा संबंध स्ट्रेस किंवा जास्त विचारांशी असतो. त्यामुळे सकाळी उठताच मोबाईल वापरल्याने मेंदूला नैसर्गिकरित्या शांततेतून जागे होण्याची संधी मिळत नाही आणि दिवसाची सुरुवात थोडी तणावपूर्ण होऊ शकते.मोबाईलवरील नोटिफिकेशन किंवा बातम्या अनेकदा तणावपूर्ण असतात. 'मेयो क्लिनिक' च्या संशोधनानुसार, सकाळी उठल्या उठल्या ईमेल्स किंवा सोशल मीडिया पाहिल्याने शरीरात 'कोर्टिसोल' (स्ट्रेस हार्मोन) ची पातळी अचानक वाढते. यामुळे तुमचा दिवस शांततेत सुरू होण्याऐवजी घाई, स्ट्रेस आणि चिंतेत सुरू होतो. म्हणजेच मेंदूला या प्रकारचे संकेत मिळतात ज्याचा परिणाम तुमच्या कामाच्या गुणवत्तेवर होतो.जेव्हा तुम्ही सकाळी ५ मिनिटांसाठी मोबाईल हातात घेता, तेव्हा 'इन्फिनिटी स्क्रोलिंगमुळे अर्धा तास कधी जातो हे समजत नाही.

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसन च्या अहवालानुसार, यामुळे मेंदूची 'अटेन्शन स्पॅन' (एकाग्रता) कमी होते. सकाळीच मेंदूला खूप जास्त माहिती मिळाल्यामुळे तो लवकर थकतो, परिणामी दिवसाच्या महत्त्वाच्या कामात तुम्हाला लक्ष केंद्रित करणे कठीण जाते.अंधारात किंवा सकाळी कमी प्रकाशात मोबाईल पाहणे डोळ्यांसाठी अत्यंत त्रासदायक आहे. 'अमेरिकन अकॅडमी ऑफ ऑप्थॅल्मोलॉजी' नुसार, मोबाईलचा 'ब्लू लाईट' डोळ्यांतील रेटिनाला इजा पोहोचवू शकतो आणि डोळ्यांवर ताण (ऊळसळींरश्र एूश डींरळप) निर्माण करतो. यामुळे डोकेदुखी आणि दिवसभर डोळ्यांची जळजळ होणे अशा समस्या उद्भवतात. सोशल मीडिया पाहताना आपण नकळत स्वतः च्या आयुष्याची तुलना इतरांचं आयुष्य कसं परफेक्ट आहे यासोबत करू लागतो. 'एमडीपीआय' च्या मते, सकाळी झोपेतून उठल्या उठल्या इतरांचे यश, आनंद किंवा सुट्ट्यांचे फोटो पाहिल्याने स्वतः बद्दल अपूर्णतेची किंवा आयुष्यातच आपणच मागे राहिलोय ही भावना मनात निर्माण होऊ लागते.

यामुळे तुमचा आत्मविश्वास कमी होतो आणि नकारात्मक विचारांचे चक्र सुरू होते.सकाळी उठल्यावर पहिले ६० मिनिटे मोबाईलपासून लांब राहणे ही तुमची सर्वात मोठी 'सेल्फ केअर' ठरू शकते. या वेळात व्यायाम, योगासने, ध्यानधारणा, प्राणायाम किंवा वाचन केल्याने तुमचा मेंदू अधिक सक्रिय आणि सकारात्मक होतो. ही वेळ मन शांत ठेवण्यासाठी, सकारात्मक विचार करण्यासाठी आणि दिवसाची चांगली सुरुवात करण्यासाठी महत्त्वाची असते. त्यामुळे उठल्याबरोबर मोबाईल वापरण्याऐवजी काही मिनिटे शांत बसणे, पाणी पिणे किंवा हलकी हालचाल करणे अधिक फायदेशीर ठरते. यामुळे मेंदूला नैसर्गिकरित्या जागे होण्याची संधी मिळते आणि दिवस अधिक ऊर्जादायी व सकारात्मक होऊ शकतो.

## गोड खाण्याची इच्छा कमी करण्यासाठी वापरा हे २ सोपे उपाय

साखर सोडण्याचा विचार केला की सर्वात आधी सल्ला दिला जातो तो म्हणजे चहा, कॉफी किंवा मिठाई सोडणे. पण खरी लढाई सुरू होते ती म्हणजे 'क्रेव्हिंग' (उीर्ीलळपस) आणि त्यासोबत येणाऱ्या चिडचिडेपणाशी. आयबीआरओ रिसर्च ऑर्गनायझेशनच्या एका संशोधनानुसार, साखर खाल्ल्यावर मेंदूत 'डोपामाइन' (ऊेिरळपश) नावाचे आनंद देणारे हार्मोन वेगाने स्रवते, जे अमली पदार्थांच्या व्यसनासारखेच असते.हार्वर्ड हेल्थ' नुसार, जेव्हा आपण अचानक साखर बंद करतो, तेव्हा मेंदूला या आनंदाच्या डोसची कमतरता भासते, ज्यामुळे आपल्याला उदास (ऋशशश्रळपस डरव) किंवा थकल्यासारखे वाटते. हा संघर्ष प्रत्येक चहाप्रेमी किंवा गोड खाणाऱ्या व्यक्तीला सहन करावा लागतो, पण तो जिंकण्यासाठी साखरेला शत्रू मानण्यापेक्षा शरीरातील विस्कळीत झालेली यंत्रणा पुन्हा ताळ्यावर आणणे गरजेचे आहे. साखरेचा हा विळखा तोडणे म्हणजे केवळ वजन कमी करणे नव्हे तर तुमच्या मानसिक शांततेची पुनर्रचना करणे होय. साखर अचानक (जींशीपळसहीं) बंद केल्यास मेंदू गोंधळून जातो, ज्याला 'विथड्रॉल सिम्टम्स' म्हणतात. 'मेयो क्लिनिक' नुसार, साखरेचे प्रमाण हळूहळू कमी करणे हा सर्वात यशस्वी मार्ग आहे. उदा. जर तुम्ही चहात दोन चमचे साखर घेत असाल तर ती दीड चमचा करा. यामुळे तुमच्या जिभेच्या टेस्ट बड्सना आणि मेंदूला या बदलाची सवय व्हायला वेळ मिळतो. अचानक साखर सोडल्याने होणारी डोकेदुखी, चिडचिडेपणा आणि उदासपणा यामुळे टळता येतो.साखरेची ओढ तेव्हाच लागते जेव्हा रक्तातील साखरेची पातळी (इश्रेव डींसरी) अचानक खाली येते. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन



च्या संशोधनानुसार, सकाळच्या नाश्त्यात अंडी, पनीर, भिजवलेले बदाम किंवा ओट्स यांसारख्या प्रथिनांचा समावेश केल्यास भूक नियंत्रित राहते. प्रथिने आणि 'गुड फॅट्स' (उदा. अक्रोड, शेंगदाणे) रक्तातील साखरेला स्थिर ठेवतात, ज्यामुळे दुपारच्या वेळी गोड खाण्याची तीव्र इच्छा होत नाही.

अनेकदा आपण मिठाई टाळतो, पण 'हेल्दी' समजल्या जाणाऱ्या पदार्थांमधून साखर पोटात जात असते. 'सीडीसी' रिपोर्टनुसार, केचप म्हणजेच सॉस, इन्स्टंट सूप, योगर्ट, बिस्किटे आणि पॅकेज्ड फ्रूट ज्यूसमध्ये मोठ्या प्रमाणात साखर असते. पदार्थांच्या पाकिटावरील 'खपसीशवळशपीीं' वाचताना सुक्रोज, फ्रुक्टोज, कॉर्न सिरप किंवा माल्टोज या नावांकडे लक्ष द्या. ही छुपी साखरच तुमच्या व्यसनाला खतपाणी घालत असते.

## बिझी असलेल्या माणसासोबत संसार कसा करावा?

आजच्या धावपळीच्या युगात, जिथे 'हसल कल्चर' (सतत काम करत राहणे) हा यशाचा मंत्र मानला जातो, तिथे नाती मात्र हळूहळू मागे पडत चालली आहेत. सकाळी उठल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत लॅपटॉपच्या स्क्रीनसमोर बसलेले पती-पत्नी, एकमेकांशी संवाद साधण्याऐवजी कामाच्या डेडलाईन्समध्ये हरवून जातात. बाहेरून पाहताना हे जोडपे यशस्वी वाटत असले, तरी घराच्या चार भिंतींच्या आत मात्र शांतता आणि एकटेपणाचा अक्राळविक्राळ पसारा असतो. लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात असणारा तो उत्साह, एकमेकांसाठी काढलेला वेळ आणि छोट्या-छोट्या गप्पा आता 'कॉन्फरन्स कॉल्स' आणि 'मीटिंग्स'च्या गर्दीत हरवल्या आहेत.जेव्हा एखादा जोडीदार कामात अतिव्यस्त असतो, तेव्हा दुसऱ्याला उपेक्षित वाटू लागते आणि तिथूनच नात्यात दुरावा निर्माण होतो. पण खरंच काम आणि करियरसाठी नात्याचा बळी देणे आवश्यक आहे का? की आपण कामाच्या व्यापातही आपल्या जोडीदाराला प्रायोरिटी देऊ शकतो? बंगळुरू येथील नारायण हेल्थ सिटी येथील प्रसिद्ध क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट श्रेया एस मूर्ती यांच्या मते, यशस्वी वैवाहिक जीवन हे केवळ एकमेकांसोबत किती तास घालवता यावर नाही, तर तुम्ही एकमेकांसाठी भावनिकदृष्ट्या किती उपलब्ध आहात, यावर अवलंबून असते. चला तर मग जाणून घेऊया, या 'बिझी' जगात आपले नाते कसे टिकवायचे आणि फुलवायचे.अतिव्यस्त जोडीदारासोबत राहताना अनेकदा घर सांभाळणाऱ्या व्यक्तीला एकटेपणा आणि चिडचिड जाणवते. दिवसभर जोडीदाराची वाट पाहणे आणि तो घरी आल्यावर रागाचा स्फोट होणे, यामुळे नाते अधिक बिघडते. यावर उपाय म्हणजे 'सतत उपलब्ध राहण्यापेक्षा' एक 'निश्चित वेळ' ठरवणे. सकाळी एकत्र चहा पिणे, रात्री झोपण्यापूर्वी किमान १५ मिनिटे मोबाईल बाजूला ठेवून गप्पा मारणे किंवा आठवड्यातून एकदा 'डेट नाईट'चे नियोजन करणे, यालाच 'प्रेडिक्टेबल कनेक्शन' म्हणतात. आपल्या मेंदूला सुरक्षित वाटण्यासाठी जोडीदाराकडून तासनतास वेळ नको असतो, तर 'हा वेळ माझा आहे' ही खात्री आणि विश्वास हवा असतो. यामुळे नात्यातील अनिश्चितता कमी होऊन भावनिक सुरक्षितता निर्माण होते.मराठीत एक म्हण आहे, 'बोलेल त्याचे सुत विकले जाते'. नात्यातही हे तितकेच लागू पडते. अनेकदा आपण जोडीदाराला 'तुझ्याकडे माझ्यासाठी वेळच नाही' किंवा 'तुला कामापुढे मी दिसतच नाही' असे टोमणे मारतो. यामुळे समोरची व्यक्ती बचावात्मक होते आणि वाद वाढतात. त्याऐवजी, आपल्या गरजा स्पष्टपणे सांगा. 'मला तुझी आठवण येतेय आणि आपण थोडा वेळ एकत्र घालवावा असे वाटते' किंवा 'तुझ्या आयुष्यात माझे महत्त्व काय आहे, हे मला जाणून घ्यायचे आहे,' असे शब्द वापरा. जेव्हा तुम्ही तुमच्या भावना थेट आणि हळुवारपणे व्यक्त करता, तेव्हा जोडीदाराला तुमची बाजू समजणे सोपे जाते आणि नात्यात गोडवा टिकून राहतो.अनेकदा जोडीदार व्यस्त असताना दुसरा जोडीदार पूर्णपणे त्याच्यावर अवलंबून राहतो, ज्यामुळे नैराश्य येते. मानसशास्त्रज्ञांच्या मते, एका निरोगी नात्यात दोन स्वतंत्र आणि सक्षम व्यक्ती असणे गरजेचे आहे. जोडीदार कामात व्यस्त असताना आपल्या आवडीनिवडी, छंद, मित्र-मैत्रिणी आणि करिअरची ध्येये यांकडे दुर्लक्ष करू नका. जेव्हा तुमच्याकडे स्वतःचे एक स्वतंत्र जग असते, तेव्हा तुम्ही भावनिकदृष्ट्या अधिक कणखर बनता. केवळ जोडीदाराच्या उपलब्धतेवर तुमचे सुख अवलंबून न ठेवता, स्वतःचे आयुष्य समृद्ध करणे हे तुमच्या नात्याला अधिक लवचिक आणि मजबूत बनवते.शरीराने घरात असणे आणि मनाने कामात असणे, हे नात्यासाठी सर्वात घातक आहे. व्यस्त जोडीदाराने हे लक्षात ठेवले पाहिजे की, घरी आल्यावर फोन बाजूला ठेवून जोडीदाराच्या डोळ्यांत बघून बोलणे हे कोणत्याही महागड्या भेटवस्तू पेक्षा मोठे आहे. त्यांच्या दिवसाबद्दल विचारा, त्यांच्या अडचणी ऐकून घ्या. समोरच्याला फक्त सल्ले नको असतात, तर कधीकधी फक्त कोणीतरी ऐकून घेणारे हवे असते. तुमच्या जोडीदाराला हे जाणवू द्या की, जरी तुमचे काम महत्त्वाचे असले, तरी ते तुमच्या आयुष्यात सर्वोच्च स्थानी आहेत. ही छोटीशी भावनिक गुंतवणूक तुमचे नाते दीर्घकाळ टिकवून ठेवते.तुम्ही कामात यशस्वी होत असताना, तुमचा जोडीदार घर सांभाळून किंवा तुमच्या अनुपस्थितीत अनेक तडजोडी करून तुम्हाला साथ देत असतो.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रजेच्या रकमेवरून वाद; महाविद्यालयात कर्मचाऱ्याने स्वतःला पेटवले, एमजीएम कॉलेजमधील प्रकार

**नांदेड:** नांदेडमधील एमजीएम इंजिनिअरिंग महाविद्यालयात धक्कादायक प्रकार घडला आहे. सेवानिवृत्त कर्मचारी सुनील कुलकर्णी यांनी अर्जित रजेची रक्कम न मिळाल्याच्या कारणावरून महाविद्यालय परिसरात स्वतःवर पेट्रोल ओतून आत्महत्येचा प्रयत्न केला. यात ते सुमारे ८० टक्के भाजले असून त्यांची प्रकृती गंभीर आहे. कुटुंबियांनी वेतन थकल्याचा आरोप केला असताना, संबंधित रक्कमेचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा दावा महाविद्यालय प्रशासनाने केला आहे. सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या ग्रॅज्युइटीच्या रकमेच्या वादातून एका कर्मचाऱ्याने महाविद्यालयातच स्वतःवर पेट्रोल ओतून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. सुनील कुलकर्णी असे या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे नाव असून ते




सुमारे ८० टक्के भाजले आहेत. त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. महाविद्यालय प्रशासनाकडून वेतन देण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे घटना घडली त्या वेळी जखमी व्यक्तीची पत्नीही तिथे उपस्थित होती.नांदेड शहरात माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांचे एमजीएम इंजिनिअरिंग महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात राज्यभरातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. महाविद्यालयात सुनील कुलकर्णी हे शिपाई पदावर कार्यरत होते. दोन वर्षांपूर्वी ते सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी अर्जित रजेची रक्कम मिळवण्यासाठी महाविद्यालय प्रशासनाकडे मागणी केली होती. पैसे न मिळाल्याने कुलकर्णी हे आपल्या पत्नीसह महाविद्यालयात पोहोचले होते.संबंधित विभागात त्यांनी अर्जित रजेच्या रकमेबाबत विचारणा केली. त्यानंतर महाविद्यालयाच्या कॅम्पसच्या मैदानात येऊन त्यांनी स्वतः वर पेट्रोल ओतून घेतले आणि स्वतः ला पेटवून घेतले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ बचाव करत आग विझवली. त्यानंतर त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. अर्जित रजा व ग्रुप एलआयसीचे जवळपास २० ते २५ लाख रुपये थकल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे.दरम्यान, या प्रकरणानंतर महाविद्यालय प्रशासनाने खुलासा केला आहे. कुलकर्णी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना नियमानुसार सेवानिवृत्तीची रक्कम देण्यात आली असून एलआयसी आणि ग्रॅज्युइटीची रक्कमही मिळाली आहे. तसेच त्यांना पेन्शनही सुरू आहे. केवळ अर्जित रजेचा विषय प्रलंबित असून ते प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याची माहिती एमजीएम महाविद्यालयाचे प्राचार्य शिरीष कोटगिरे यांनी दिली. कुटुंबियांनी केलेले आरोप खोटे असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

## पुण्यात ६ वर्षांच्या चिमुरडीला अत्याचार करुन संपवलं, आईची साथ; शिक्षा रद्द

**पुणे :** अवघ्या सहा वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करुन तिची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी पुण्यातील विशेष पोक्सो न्यायालयाने तरुणाला ठोठावलेली फाशीची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी काही कायदेशीर बाबींची पूर्तता नसल्याच्या कारणावरून रद्दबातल केली. तसेच, त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून चार महिन्यांत अंतिम निकाल देण्याचा आदेश पोक्सो न्यायालयाला दिला आहे. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेजवळच्या झुडपांमध्ये ३ ऑगस्ट २०२२ रोजी पीडित मुलीचं शव सापडलं होतं. त्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांनी तपास केला असता, या मुलीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याचे उघडकीस आले.मिळालेल्या माहितीवरून, पोलिसांनी पीडितेच्या घराजवळ राहणाऱ्या २४ वर्षीय तेजस उर्फ दादा महिपती दळवी याला अटक केली. तो एका फार्म हाऊसवर कामाला होता आणि त्याला अश्लाघ्य चित्रफिती पाहण्याची सवय होती, असे पोलिसांच्या तपासात समोर आले होते. तसेच, घडलेल्या गुन्ह्यात तेजसला त्याच्या आईने मदत केल्याचेही समोर आले. पोक्सो न्यायालयाने याप्रकरणी खटल्याच्या सुनावणीअंती २२ मार्च २०२४ रोजी तेजसला फाशीची तर, त्याच्या आईला सात वर्षांची शिक्षा ठोठावली. त्यानंतर दोघांनीही शिक्षेविरोधात उच्च न्यायालयात अपील केले, तर तेजसची फाशीची शिक्षा कायम होण्यासाठी राज्य सरकारने याचिका केली. खटल्यात रासायनिक विश्लेषणाच्या १२ अहवालांचा आधार घेण्यात आला. मात्र, आम्हाला विश्लेषकाची उलटतपासणी करता यावी यासाठी त्याला न्यायालयात पाचारणच करण्यात आले नाही. शिवाय कलम ३१३ अन्वये न्यायालयाने आमचे जबाब स्वतंत्र नोंदवले नाहीत. आम्हाला एकत्रित प्रश्न विचारून उत्तरे लिहिण्यात आली. या दोन्ही कारणांमुळे खटल्यात कायदेशीर प्रक्रियेचा भंग झाला आहे', असे म्हणत दोन्ही दोषींनी ॲड. रिबेका गोन्साल्विझ यांच्यामार्फत अर्जही केला होता.

## २३ वर्षीय तरुणीला भररस्त्यात अडवलं, हातही पकडला; थेट ठरलेलं लग्न मोडलं; अहिल्यानगरमधील घटनेनं संताप

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील कायनेटिक चौक परिसरात एका २३ वर्षीय तरुणीसोबत धक्कादायक घटना घडली आहे. आधी या तरुणीचा पाठलाग करत तिचा विनयभंग करण्यात आला आणि नंतर प्रेमसंबंध असल्याचं सांगून तिचं ठरलेलं लग्न मोडल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, तू दुसऱ्या कोणाशी लग्न केलंस तर याद राख, अशी धमकी देत पीडित तरुणीवर दबाव टाकण्याचाही प्रयत्न आरोपीने केला होता. पीडित तरुणी कायनेटिक चौक परिसरातील गजराज हॉटेलसमोरून घरी जात होती. यावेळी तुषार अर्जुन हरेल (रा. येलुलकर चाळ, रेल्वे स्टेशन परिसर, अहिल्यानगर) याने तिला रस्त्यात अडवलं आणि आरोपीने भररस्त्यात तरुणीचा हात धरत लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. यापूर्वी आरोपीने तरुणीकडे लग्नाची मागणी घातली होती. मात्र तिच्या कुटुंबीयांनी स्पष्ट शब्दांत नकार दिला होता. याचाच राग मनात धरून आरोपीने तिला अडवलं आणि तू दुसऱ्या कोणाशी लग्न केलंस, तर याद राख, अशी उघड धमकी देत तिच्यावर दबाव टाकण्याचाही प्रयत्न केला.तरुणीवर दबाव टाकल्यानंतर आरोपीने आणखी एक धक्कादायक पाऊल उचललं. त्याने तरुणीच्या होणाऱ्या सासरच्या मंडळींशी संपर्क साधला आणि आमचे प्रेमसंबंध आहेत, तिच्याशी लग्न करू नका, असं खोटे सांगून त्याने तरुणीचं ठरलेलं लग्नच मोडलं. या प्रकारामुळे




तरुणी व तिच्या कुटुंबावर मोठा मानसिक आघात झाला आहे. दरम्यान, पीडित तरुणीच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी तुषार हरेल या आरोपीविरुद्ध विनयभंग आणि धमकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास महिला पोलीस हवालदार रोहिणी दरदले करत असून नगर शहरात घडलेल्या या प्रकारामुळे महिलांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

## गॅस बंद होणार'चा मेसेज; डोंबिवलीत महिलेला बसला ३ लाखांचा फटका

**डोंबिवली :** एकीकडे अमेरिका आणि इराणमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक स्तरावर गॅस पुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे सर्वत्र दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आधीच चिंतेचे वातावरण असताना सायबर भामट्यांनी याच भीतीचा फायदा घेत फसवणुकीचा नवा मार्ग शोधला आहे. डोंबिवलीत 'महानगर गॅस'चे बिल भरले नसल्याची भीती दाखवून एका नोकरदार महिलेला तब्बल २ लाख ९९ हजार ५०० रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवलीतील सुनीलनगर परिसरात राहणाऱ्या स्मिता राणे या नोकरदार महिलेला गेल्या आठवड्यात त्यांच्या पतीच्या मोबाईलवर एक एसएमएस प्राप्त झाला. 'तुम्ही भरलेले महानगर गॅसचे देयक आमच्याकडे दिसत नाही. तातडीने अपडेट न केल्यास तुमचे गॅस कनेक्शन बंद करण्यात येईल,' असा






इशारा त्या संदेशात देण्यात आला होता. सध्या गॅस तुटवड्याच्या चर्चेमुळे आधीच चिंता निर्माण झाल्याने स्मिता राणे यांनी घाईघाईत त्या मेसेजमधील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला.फोनवरील व्यक्तीने स्वतःला महानगर गॅस कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे सांगत त्यांना विश्वासात घेतले. तांत्रिक अडचणीमुळे त्यांचे बिल सिस्टममध्ये दिसत नसल्याचे सांगून त्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया करावी लागेल, असे सांगण्यात आले. बोलता बोलता भामट्याने त्यांना एक लिंक पाठवली. ती लिंक उघडल्यानंतर स्मिता राणे यांनी त्यात डेबिट आणि क्रेडिट कार्डची माहिती भरली.यानंतर प्रक्रिया पूर्ण होत नसल्याचे सांगत भामट्याने त्यांना फोनवरच गुंतवून ठेवले. त्याच दरम्यान त्यांच्या क्रेडिट कार्डमधून २ लाख रुपये आणि डेबिट कार्डमधून ९९ हजार ५०० रुपये, असे एकूण २ लाख ९९ हजार ५०० रुपये त्यांच्या खात्यातून काढून घेतले.

काही वेळाने बँकेचे व्यवहाराचे मेसेज मोबाईलवर आल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे स्मिता राणे यांच्या लक्षात आले.घडलेल्या प्रकारानंतर त्यांनी तातडीने रामनगर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात सायबर भामट्यांविरोधात गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# अब्रार पहिला नाही! दोन पाकिस्तानी खेळाडूंची शाहरुख-जुहीच्या संघाने केलेली खरेदी



**मुंबई :** चेन्नईस्थित मीडिया समूह 'सन ग्रुप'च्या मालकीच्या सनरायझर्स लीड्स संघाने गुरुवारी 'द हंड्रेड'च्या लिलावात अब्रारला करारबद्ध केले. त्यासाठी या संघाने अंदाजे २.३४ कोटी रुपये मोजले. ही स्पर्धा २१ जुलै ते १६ ऑगस्टदरम्यान होणार आहे. वृत्तसंस्थेशी बोलताना शुक्ला म्हणाले, 'हा संघाचा वैयक्तिक निर्णय आहे; कारण ही आमची लीग नाही. पाकच्या खेळाडूशी करार आयपीएलसाठी झालेला नाही. ही भारताबाहेरील, इंग्लंडम धील लीग आहे. परदेशातील लीगमध्ये आम्ही हस्तक्षेप करू शकत नाही.' पण अब्रार हा पहिला खेळाडू नाही ज्याला आपीएलममधील भारतीय मालकीच्या फ्रँचायसीने विकत घेतले आहे. याआधी शाहरूख खान आणि जुह चावला यांच्या मालकीच्या त्रिंबागो नाइट रायडर्सकडबून दोन खेळाडू खेळले आहेत.महंमद आमीर आणि उस्मान तारीक हे दोन्ही त्रिंबागो नाइट रायडर्स संघाकडून खेळले आहेत. या संघाची म ालकी शाहरुख खान, जुही चावला, जय मेहता या भारतीयांकडे आहे. यांच्याकडेच आयपीएलमधील कोलकाता संघाचीही मालकी आहे. माजी अष्टपैलू इमाद वासीम हा मेजल लीग क्रिकेट या स्पर्धे त २०२५मध्ये खेळला. या कंपनीची म ालकी जीएमआर ग्रुपकडे आहे. हाच ग्रुप आयपीएलमधील दिल्ली कॅपिटल्स संघाचा आहे. पाकिस्तानचा क्रिकेटपटू उस्मान खान हा आयएलटी-२० स्पर्धेत गेल्या वर्षी एमआय एमिरेट्स संघाकडून खेळला. बर्मिंगहॅम फिनिक्सने अंदाजे १.७२ कोटी रुपये मोजून फिरकीपटू उस्मान तारिकची खरेदी केली. अन्नार हा लिलावात विकला गेलेला दुसरा पाकिस्तानी खेळाडू ठरला. सईम अयुब, हारिस रौफ, शादाब खान यासारखे इतर अनेक पाकिस्तानी खेळाडू विकले गेले नाहीत.'द हंड्रेड' म्हणजे आयपीएल नाही. त्यामुळे एवढा वाद निर्माण करण्याची गरज नाही. परदेशातील लीगशी आमचा काही संबंध नाही,' असे स्पष्ट मत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी व्यक्त केले. 'द हंड्रेड' क्रिकेट स्पर्धे च्या लिलावात सनरायझर्स लीड्स संघाने पाकिस्तानचा फिरकीपटू अब्बार अहमदला करारबद्ध केल्याने मोठा वाद निर्माण झाला. अब्रारला करारबद्ध केल्यानंतर सनरायझर्स लीड्स संघावर सोशल मीडियावरून टीका सुरू झाली. या संघाचे 'एक्स' खाते काही काळासाठी निलंबित करण्यात आले. दोन देशांमधील तणावपूर्ण राजनैतिक संबंधांम ुळे २००९ पासून आयपीएल फ्रँचायझींनी कोणत्याही पाकिस्तानी खेळाडूला करारबद्ध केलेले नाही.आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबादची मालकी असलेल्या 'सन ग्रुप' ने नॉर्दर्न सुपरचार्जर्सचा (पूर्वीचे नाव) संपूर्ण ताबा घेतला. त्यांनी इंग्लंड अँड वेल्स बोर्डकडून ४९ टक्के आणि काँटी क्लब यॉर्कशायरकडून उर्वरित ५१ टक्के हिस्सा विकत घेतला. 'सनरायझर्स'च्या मुख्य कार्यकारी अधिकारी काव्या मारन गुरुवारच्या लिलावाला उपस्थित होत्या आणि त्यांनी बोलीदरम्यान पॅडल उचलले. त्यामुळे सोशल मीडियावरून त्यांनाही 'ट्रोल' केले जात आहे.

## पाकिस्तानच्या खेळाडूला गंभीर दुखापत



**ढाका :** पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानला मोठा धक्का बसला जेव्हा त्यांचा प्रमुख अष्टपैलू खेळाडू हुसेन तलत क्षेत्ररक्षण करताना जखमी झाला. बांगलादेशच्या डावाच्या सातव्या षटकात त्याला इतके वेदना होत होत्या की त्याला स्ट्रेचरवर मैदानाबाहेर काढावे लागले. त्याला इतके वेदना होत होत्या की त्याला स्ट्रेचरवर मैदानाबाहेर काढावे लागले. त्याच्या दुखापतीची तीव्रता किंवा तो पुढील सामन्यात खेळू शकेल की नाही याबद्दल कोणतीही माहिती नाही.बांगलादेशच्या डावाच्या सातव्या षटकात लिटन दासने शाहीन आफ्रिदीच्या गोलंदाजीवर डीप थर्ड षटकात शॉट मारला. क्षेत्ररक्षण करताना तलतच्या खांद्याला दुखापत झाली. तो वेदनेने ओरडत होता आणि जमिनीवर पडून होता. त्यानंतर पाकिस्तानच्या सपोर्ट स्टाफने मैदानावर धाव घेतली आणि त्याची काळजी घेतली. तलतची प्रकृती गंभीर असल्याने त्याला स्ट्रेचरवर काढावे लागले. सामन्यादरम्यान त्याला ताबडतोब रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले.जानेवारी २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतून हुसेन तलतने एकदिवसीय सामन्यात पदार्पण केले. ऑगस्ट २०२५ मध्ये तो वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी पाकिस्तानी संघात परतला. ३० वर्षीय या फलंदाजाने पाकिस्तानसाठी ११ एकदिवसीय साम न्यांमध्ये २१५ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये एका अर्धशतकाचा समावेश आहे.या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकले आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना २७४ धावा केल्या. माझ सदकतने ४६ चेंडूत ७५ धावा केल्या, हे त्याचे कारकिर्दीतील पहिले अर्धशतक होते. त्याने त्याच्या डावात पाच षटकार मारले. सलमान आगानेही ६४ धावा केल्या. मोहम्मद रिझवानने ५९ चेंडूत ४४ धावा केल्या. असे असूनही, पाकिस्तान ५० षटके पूर्ण करू शकला नाही. प्रत्युत्तरात, बांगलादेशची सुरुवात खराब झाली, त्यांनी फक्त १५ धावांत तीन विकेट गमावल्या. लवकरच पाऊस सुरू झाला, ज्यामुळे सामना बराच काळ थांबवावा लागला.

## हेल्मेट फेकले, ग्लोव्हज फेकले, चपळाईने रनआऊट करताच सलमान अली आगा चिडला

**ढाका :** ढाका येथे पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना सुरू असून, पाकिस्तानी फलंदाज डरश्नारप असहर शी वाद निर्माण झाला आहे. बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात सलमान आगा त्याच्या धावण्याच्या पद्धतीवर नाराज होता, ज्यामुळे तो संतापला. धावबाद झाल्यानंतर त्याच्या रागावलेल्या कृतींमुळे त्याला शिक्षा होईल असे दिसते.

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात सलमान आगाच्या धावबाद होण्याची घटना पाकिस्तानच्या डावाच्या ३९व्या षटकात घडली. बांगलादेशी गोलंदाज मेहदी हसनच्या षटकातील चौथा चेंडू रिजवानच्या बॅटला लागला आणि तो थेट गोलंदाजावर गेला. दरम्यान, नॉन-स्ट्रायकरच्या टोकावर उभा असलेला सलमान आगा क्रीजच्या बाहेर पडला. जेव्हा चेंडू रिजवानच्या बॅटला लागला आणि गोलंदाजाकडे जात होता, तेव्हा सलमान आगाने मेहदी हसनच्या आधी तो रोखला. त्याने चेंडू उचलला आणि गोलंदाजाकडे देण्याचा प्रयत्न केला, तो सर्व काही क्रिजच्या बाहेर राहून. मेहदी हसनची चपळता सलमान आगासाठी खूपच महाग ठरली. त्याने लगेच चेंडू उचलला आणि नॉन-स्ट्रायकर एंडवर क्रिजच्या बाहेर उभ्या असलेल्या सलमान आगाच्या बेल्सवर फेकलामेहदी हसनने बेल्स फेकल्यानंतर, सलमान आगाने त्याच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. सलमान आगाने तो बाद नसल्याचे मानले. जेव्हा प्रकरण तिसऱ्या पंचाच्या कोर्टात पोहोचले तेव्हा निकाल सलमान आगाच्या विरोधात गेला. सलमान आगाने पंचाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली.



तो संतापला आणि त्याने त्याचे हेल्मेट आणि ग्लोव्हज काढून मैदानावर फेकण्यास सुरुवात केली.क्रिकेटच्या नियमांनुसार, पंचाच्या निर्णयाचे उल्लंघन करणे, राग दाखवणे किंवा त्याचे हेल्म `ट आणि ग्लोव्हज फेकणे हे दंडनीय गुन्हे आहेत. आयसीसीच्या आचारसंहितेनुसार, अशा प्रकरणांमध्ये खेळाडू लेव्हल १ किंवा लेव्हल २ च्या गुन्ह्यांसाठी दोषी आढळतो. सलमान आगाने केलेल्या कृती मॅच रेफरी, फील्ड पंच आणि थर्ड अंपायर यांना कळवाव्या लागतील. आता, मॅच रेफरी कोणत्या पातळीच्या गुन्ह्याचा विचार करतात हे पाहणे बाकी आहे. सलमान आगाला त्यानुसार शिक्षा होऊ शकते. सामान्यतः, अशा प्रकरणांमध्ये, खेळाडूंना त्यांच्या सामन्याच्या मानधनात कपात करून डिमेरिट पॉइंट्स दिले जातात. सलमान आगा धावबाद झाला तेव्हा तो ६२ चेंडूत ६४ धावा करत होता.

## जोश हेझलवुड आरसीबीकडून खेळणार नसल्याची चर्चा; कारण आलं समोर



**मुंबई :** मुंबई : इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या पहिल्या भागाचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. स्पर्धेतील पहिला साम ना २८ मार्च रोजी ठूरश्र उहरश्रश्रशपसशी इशपसश्रीीं आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जाईल. आरसीबी हा गतविजेता आहे, परंतु त्यापूर्वी संघासाठी एक वाईट बातमी आली आहे. स्टार वेगवान गोलंदाज Josh Hazlewood अजूनही दुखापतीतून बरा होत आहे. हेझलवुड २८ मार्च रोजी संघाच्या पहिल्या सामन्यातून बाहेर पडणे जवळजवळ निश्चित आहे. हेझलवुडला अद्याप फिजिओकडून मैदानात उतरण्यासाठी हिरवा कंदील मि ळालेला नाही. नोव्हेंबरमध्ये न्यू साउथ वेल्स आणि व्हिक्टोरिया यांच्यातील शेफील्ड शिल्ड सामन्यानंतर हेझलवुड खेळलेला नाही, त्यानंतर तो २०२५-२६ च्या ॲशेस मालिकेतून बाहेर पडला. जरी नंतर त्याला ऑस्ट्रेलियाच्या टी२० विश्वचषक संघात समाविष्ट करण्यात आले असले तरी, आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्याच्या फक्त पाच दिवस आधी हेझलवुडला पायाची दुखापत झाली.स्टीव्ह स्मिथने हेझलवुडची जागा संघात घेतली, परंतु त्यालाही खेळण्याची संधी मिळाली. ऑस्ट्रेलियाची स्थिती इतकी बिकट झाली की त्यांना गट फेरीतून बाहेर पडावे लागले. एकंदरीत, हेझलवुड गेल्या काही महिन्यांपासून हॅमस्ट्रिंग, ॲकिलीस आणि वासराच्या दुखापतींशी झुंजत आहे. तो अजूनही फिजिओच्या देखरेखीखाली आहे आणि आयपीएलमध्ये त्याचा सहभाग तो क्लिअर होतो की नाही यावर अवलंबून आहे.आरसीबीच्या एका सूत्राने सांगितले की, 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू त्यांच्या गोलंदाजीच्या योजनांसाठी हेझलवूडवर अवलंबून आहे, कारण २०२५च्या आयपीएल हंगामात ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाजाने संघाच्या ऐतिहासिक पहिल्या विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावली होती. फ्रँचायझीकडे नुवान तुषारा आणि जेकब डफफीसारखे परदेशी वेगवान गोलंदाज देखील आहेत, परंतु हेझलवूडचा अनुभव इतर वेगवान गोलंदाजांपेक्षा वेगळा आहे. परिणामी, आरसीबीसाठी त्याचा सहभाग महत्त्वाचा बनला आहे.'आरसीबी आयपीएल २०२६ चा त्यांचा पहिला सामना सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध खेळणार आहे. हा सामना २८ मार्च रोजी बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियम वर होणार आहे. या मोठ्या सामन्यात एसआरएचचा कर्णधार पॅट कमिन्सचा सहभागही संशयाच्या भोवऱ्यात आहे. कमिन्स देखील बरे होत आहे. कमिन्सच्या नेतृत्वाखाली एसआरएचने आपल्या स्फोटक खेळाने मोठा चाहता वर्ग तयार केला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सख्ख्या बहिणीनेच केलेला विश्वासघात, अभिनेत्रीच्या नवऱ्यासोबत थाटला संसार, संपत्तीही हडपली



**मुंबई :** 'मैने प्यार किया' आणि 'हम साथ साथ हैं' सारख्या चित्रपटांमध्ये सलमान खानसोबत काम करणाऱ्या अभिनेत्रीची ही कहाणी आहे. ही अभिनेत्री एकेकाळी खूप प्रसिद्ध होती, पण तिच्या नातेवाईकांनी तिचा इतका वाईट विश्वासघात केला की, तिला रस्त्यावर सोडून देण्यात आलं, ना अन्न ना पैसं. या अभिनेत्रीचं नाव हुमा खान असून तिनं 'हम साथ साथ हैं' मध्ये मिस रेहानाची आणि 'मैने प्यार किया' मध्ये गुलबियाची भूमिका साकारली होती. हुम ाला तिच्या कुटुंबाकडून विश्वासघात सहन करावा लागला. बहिणीनंच तिच्या पाठीत खंजीर खुपसलाहुमा खान पाकिस्तानात वाढली आणि तिथेच तिनं बाल कलाकार म्हणून अनेक चित्रपट आणि टीव्ही शोमध्ये काम केलं. बॉलिवूडमध्ये काम करण्यासाठी हुमा खान भारतात आली. १९८१ मध्ये तिनं 'आपस की बात' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर तिला चित्रपट मिळू लागले. हुमाने नंतर 'हम हैं लजवाब', 'अंदर बाहर' आणि 'आज का एमएलए' सारख्या चित्रपटांमध्ये काम केलं. पण सूरज बडजात्या यांनी तिला 'मैने प्यार किया' मध्ये कास्ट केलं आणि हुमाचं नशीब पालटलं. हा चित्रपट सुपरहिट झाला, ज्यामुळे सलमान एका रात्रीत स्टार झाला आणि हुमा खान देखील प्रसिद्धी झोतात आली. 'मैने प्यार किया' नंतर हुमानं 'हम साथ साथ हैं' मध्ये मिस रेहानाची भूमिका साकारली. दरम्यान, १९९२ मध्ये हुमा खानचं लग्न मोहम्मद अलीसोबत झालं. हुमा खानने पती आणि कुटुंबासाठी अभिनय सोडला. हुमा खानने काही वर्षांपूर्वी ट्व्हायरल बॉलिवूड' ला दिलेल्या मुलाखतीत याबद्दल सांगितलेलं. अभिनेत्रीनं सांगितलेलं की, ज्या माणसाशी तिनं लग्न केलेलं, त्यानेच तिला लग्नानंतर तिचं करिअर आणि चित्रपट सोडून देण्यास भाग पाडलं होतं. नंतर नवऱ्याने हुमाला सोडून दिलं. हुमाची बहीण नईमा, एक लोकप्रिय पाकिस्तानी अभिनेत्री, यासाठी जबाबदार होती. हुमा खाननं खुलासा केला होता की, तिची बहीण नईमाने तिच्या पतीशी लग्न केलं आणि नंतर तिची सर्व मालमत्ता हडपली. यानंतर, हुमा खानला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला.हुमा खानने खुलासा केला होता की, तिचा पती मोहम्मद अमेरिकेत काम करत होता पण वेळेवर पैसे पाठवू शकत नव्हता. त्याला तिथं स्थायिक होण्यास मदत करण्यासाठी, अभिनेत्रीनं तिचं मुंबईतील घर आणि तिचे सर्व दागिने विकले, परंतु सर्व काही जुळून आलं नाही. हुमाने सांगितलं की, जेव्हा ती नंतर तिच्या पतीसोबत पाकिस्तानला गेली तेव्हा तिची बहीण नईमा तिला टोमणे मारत म्हणाली, 'तू कोणत्या माणसाशी लग्न केलं आहेस? तो दिसायला चांगला नाही. एखाद्या चांगल्या माणसाशी लग्न केलं असतं तर बरं झालं असतं.' आणि मग नईमाने हुमाच्या पतीसोबत लग्न केलं.हुमा खानने सांगितलं की, तिच्या बहिणीशी लग्न केल्यानंतर तिच्या पतीने तिच्याशी बोलणंच बंद केलं नाही तर तिला पैसे पाठवणंही बंद केलं. शिवाय, तिच्या बहिणीनं तिच्या सासरच्या घराचा ताबाही घेतला. अभिनेत्रीच्या आईचंही निधन झालं. त्यानंतर, तिच्या भावंडांनी आणि तिच्या कुटुंबातील इतर सदस्यांनीही तिच्याशी असलेले संबंध तोडले.हुमा खान इतकी निराश झाली होती की, तिनं दोनदा आत्महत्येचा प्रयत्न केला. त्या कठीण काळात तिला सलमान खानची आठवण आली आणि ती त्याच्याकडे मदतीसाठी गेली. हुमाने सांगितले होतं की, २०१४-१५ मध्ये त्यावेळी सलमान कर्जतमध्ये 'प्रेम रतन धन पायो'चं शूटिंग करत होता. हुमाने सलमानकडे विनवणी केली आणि मदत मागितली. हुमाची अवस्था पाहून सलमानने शूटिंग थांबवलं. सलमानने हुमाला एक लाख रुपयेही दिले आणि तिला मदत करण्याचं आश्वासनही दिलं. आज, हुमा अभिनयापासून दूर असली तरी ती सलम ानच्या मदतीमुळे सुखी आयुष्य जगत आहे.

# फाळणीच्या पार्श्वभूमीवर फुलणारी लव्हस्टोरी ; 'इम्तियाज अलीच्या 'मैं वापस आऊंगा'चा हृदयस्पर्शी टीझर



**मुंबई :** बॉलिवूडचे असे मोजके दिग्गज आहेत, ज्यांच्या सिनेम ांची प्रेक्षक वाट पाहत असतात. यापैकी एक आहे दिग्दर्शक इम्तियाज अली. इम्तियाज अली पुन्हा एकदा प्रेक्षकांसाठी एक संवेदनशील आणि मनाला भिडणारी लव्हस्टोरी घेऊन येत आहेत. त्याच्या आगामी ' मैं वापस आऊंगा ' या चित्रपटाचा अधिकृत टीझर आज प्रदर्शित झालाय. सोशल मीडियावर या ट्रेलरची जोरदार चर्चा सुरू आहे.'मैं वापस आऊंगा' सिनेम ाचा सुमारे १ मिनिट १३ सेकंदाचा हा टीझर अत्यंत भावूक असा आहे. ट्रेलरची सुरुवात सुरुवात ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शाह यांच्यापासून होते, जे हॉस्पिटलच्या बेडवर असून ७८ वर्षांपूर्वीची आपली अर्धवट राहिलेली लव्हस्टोरी आठवत आहेत. दिलजीत दोसांझ त्यांच्या नातवाच्या भूमिकेत असून तो लव्हस्टोरी प्रेक्षकांना सांगताना दिसतो.टीझर आपल्याला थेट १९४७ च्या फाळणीपूर्वीच्या काळात घेऊन जातो. तिथं तरुणपणीचे नसीरुद्दीन शाह (ज्यांची भूमिका वेदांग रैना याने साकारली आहे) आणि त्यांची प्रेयसी ( शर्वरी वाघ ) यांच्यातील प्रेम पाहायला मिळतं. मात्र, फाळणीमुळं हे प्रेमी युगुल वेगळं होतं. रेल्वे स्टेशनवर आपल्या प्रेयसीला दिलेला 'मी परत येईन' (मैं वापस आऊंगा) हा शब्द आणि त्यावेळच्या वेदना टीझरमध्ये प्रभावीपणे मांडल्या आहेत.अमर सिंह चम किला'च्या मोठ्या यशानंतर इम्तियाज अली आणि दिलजीत दोसांझ ही जोडी पुन्हा एकदा एकत्र आली आहे. तसंच, रहमान आणि इर्शाद कामिल यांच्या संगीतानं टीझरची रंगत आणखी वाढवली आहे.या चित्रपटाबद्दल बोलताना इम्तियाज अली म्हणतो की, प्रेम कधी हरवू शकतं का? किंवा हरू शकता का? फाळणीच्या काळात अनेकांची घरे सुटली, पण त्यांच्या मनात राहिलेली प्रेमाची भावना आजही कायम आहे. ही कथा त्याच भावनांवर आधारित आहे.हा चित्रपट १२ जून २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. टीझरच्या शेवटी दिलजीत दोसांझने मिश्किलपणे 'लाईक, कमेंट आणि सबस्क्राईब' करायला सांगितल्यानं टीझरमध्ये काहीसा हलका-फुलकापणाही झाला आहे.

# नवोदित अभिनेत्रींना देहव्यापारात ढकललं जातं' तनुश्री दत्ताचे गंभीर आरोप

**मुंबई :** तनुश्री दत्ता अनेकदा तिच्या वक्तव्यामुळे चर्चेत असते. अशातच आता पुन्हा एकदा चित्रपटसृष्टीतील फसवणुकीबद्दल तिनं भाष्य केलं आहे. 'मेरी सहेली' ला दिलेल्या अलिकडेच दिलेल्या म ुलाखतीत तनुश्री म्हणाली की, अनेक नवोदित कलाकारांना आश्वासनांचं आमिष दाखवलं जातं आणि नंतर कठीण परिस्थितीत अडकवलं जातं.तनुश्री म्हणाली, 'तू सुंदर आहेस, म्हणत कोणीतरी त्यांना आपल्या जाळ्यात अडकवतं. तू अभिनेत्री होशील, असं सांगितलं जातं. तनुश्री दत्ता म्हणाली की, पालक मुलांना अनोळखी लोकांपासून सावध राहण्याचा सल्ला देतात, परंतु मुलं त्या सल्ल्याचं पालन करत नाहीत. अभिनेत्री म्हणाली, 'आम्ही लहान असताना पालकांनी आम्हाला काय शिकवलं? अनोळखी लोकांसोबत जाऊ नका. जर कोणी तुम्हाला चॉकलेट दाखवलं तर तुम्ही त्यांच्यासोबत जाल का? चॉकलेट म्हणजे फक्त चॉकलेट नाहीये. इथे एक वेगळ्या प्रकारची चॉकलेट आहे. लोक तुमच्या म



हत्त्वाकांक्षा, आशा आणि इच्छांचा वापर करतात. ते त्यांच्याशी खेळतात.'मी आज बोलतेय कारण, जर माझ्याकडे एक व्यासपीठ असेल आणि मी चार जीव वाचवू शकले तर ते माझ्यासाठी पुरेसं आहे. इंडस्ट्रीत खूप मुलं आणि मुली येतात. त्यांचा वापर केला जातो आणि त्यांचा छळ केला जातो आणि नंतर अक्षरशः फ ेकून दिलं जातं.' असं तनुश्रीनं सांगितलं. तनुश्रीनं दावा केला की, काही पीडितांना आणखी वाईट परिस्थितीत ढकललं जातं. अभिनेत्री म्हणाली, 'काही लोक वेश्याव्यवसायात जातात कारण त्यांच्यावर इतके अत्याचार केले जातात की लोक त्यांना भाग पाडतात.

# प्राजक्ता शुक्रेचा पत्ता कट, नवव्या आठवड्यात गायिका एलिमिनेट



**मुंबई :** बिग बॉस मराठी ६ हा शो सध्या चर्चेत असून या शोमध्ये राखी सावंतची एन्ट्री झाल्यामुळे घरामध्ये राडा होताना पाहायला मिळत आहे. काही स्पर्धक असे आहेत, जे फक्त गॉसिप करतायत, पण त्यांचा गेम दिसत नाहीये. त्यावरून रितेश देशमुखने भाऊच्या धक्क्यावर या स्पर्धकांना सुनावलेलं सुद्धा. त्यापैकी एक म्हणजेच प्राजक्ता शुक्रे . प्राजक्ताचा बिग बॉसमध्ये गेम दिसत नाहीये. हे घरातील सदस्यांना नव्हेच तर प्रेक्षकांनाही दिसून आलं आहे. त्यामुळे आता प्राजक्ता शुक्रे बिग बॉसच्या नवव्या आठवड्यात एलिमि नेट झाल्याच्या चर्चा सोशल मीडियावर सुरू आहेत.प्राजक्ता शुक्रेचा गेम पहिल्या दिवसापासून फारसा दिसत नाहीये. ती कोणत्याही वादात नसते, कोणासोबत मोठ्याने ओरडून बोलत नाही, त्यामुळे तन्वीनं प्राजक्ताला 'आयुर्वेदिक' असं नाव ठेवलं आहे. करण सोनावणे बिग बॉसमध्ये असताना प्राजक्ता शुक्रे त्याच्यासोबत गॉसिप करताना दिसायची. त्याचबरोबर करण आणि प्राजक्ता इतर स्पर्धकांना नावंही ठेवायचे. रितेशनं अनेकदा भाऊच्या धक्क्यावर प्राजक्ताला तिच्या गेमबद्दल सांगितलेलं आणि सम जावलेलं. पण तिनं त्यात बदल केला नाही आणि त्यामुळे आता प्राजक्ता बिग बॉसच्या बाहेर गेली आहे.बिग बॉसच्या कालच्या भागात अनुश्री आणि विशाल प्राजक्ताबद्दल बोलताना म्हणत होते की, 'सागर प्राजक्ताला का सपोर्ट करतोय, तिचा काही गेमच नाहीये' अनुश्रीचं म्हणणं विशाललाही पटतं. प्राजक्ताचा काहीच गेम दिसत नसल्यामुळे आता प्रेक्षकांनीही तिला वोट केलेलं नाही. त्यामुळे बिग बॉस मराठीच्या नवव्या आठवड्यात प्राजक्ताचा प्रवास संपला असल्याच्या चर्चा सुरू आहेत.दरम्यान, बिग बॉस मराठी ६च्या आठव्या आठवड्यापर्यंत राधा मुंबईकर, दिव्या शिंदे, ओमकार राऊत, सोनाली राऊत, आयुष संजीव, करण सोनावणे, सचिन कुमावत, रोशन भजनकर आणि रुचिता जामदार हे स्पर्धक एलिमिनेट झाले. त्यामुळे आता सोशल मीडियावर होणाऱ्या चर्चांनुसार प्राजक्ता शुक्रे खरंच एलिमिनेट होणार का? हे पाहणं उत्सुक्तेचं ठरणार आहे.

# चिखली विधानसभा क्षेत्रात भाजपाच्या विकासाच्या वाटचालीत मोठ्या संख्येने पक्षप्रवेश...

**जनसंचलन/ चिखली**

देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. रवींद्रजी चव्हाण यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या विकासाच्या धोरणावर विश्वास ठेवत आज चिखली विधानसभा क्षेत्रातील अनेक मान्यवर काँग्रेस नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष मा. रवींद्रजी चव्हाण यांच्या हस्ते आणि आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील यांच्या नेतृत्वात हा पक्षप्रवेश सोहळा उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. पक्षप्रवेश केलेले मान्यवर या सोहळ्यात नंदू भाऊ सवडतकर (माजी नगराध्यक्ष, माजी उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, चिखली), अरविंद देशमुख (संचालक खरेदी विक्री, संचालक जिनिंग प्रेसिंग चिखली, माजी सभापती पंचायत समिती चिखली), डॉ. गुलाबराव सपकाळ, राहुल सवडतकर (काँग्रेस शहराध्यक्ष, चिखली), दयानंद खरात (माजी उपसभापती, चिखली), दिलीप नरवाडे (माजी सरपंच, शेलोडी), प्रा. विजय घ्याळ (शेलसुर), सरपंच अरुण सरनाईक (शेळगाव जहागीर), जगन्नाथ अंभोरे, सरपंच अनिल फेपाळे (रुईखेड), शिवाजी नपते (उपसरपंच), सतीश वाघमारे, गणेश फपाळे, राहुल काकफळे, सिद्धार्थ मगर (सर्व ग्रामपंचायत सदस्य, रुईखेड), भागवत नेवरे, ज्ञानेश्वर रामेकर (माजी उपसरपंच), शेणफड नेमणार, अमोल काकडे (भालगाव), नितिन घेवंदे (माजी उपसरपंच, शेलगाव/अन्वी गट ग्रामपंचायत), सागर सुरडकर (सदस्य ग्रामपंचायत), मदन आंभोरे, अमोल सरनाईक, गजानन ठेंग, गजानन चव्हाण, नितिन आंभोरे यांनी भाजपात प्रवेश केला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, हा जिल्हा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ यांचाच गृहजिल्हा आहे. तरीही येथून मोठ्या प्रमाणात काँग्रेसजन भाजपासह अन्य पक्षांत जात असल्याने काँग्रेस पक्षाची अवस्था अत्यंत चिंताजनक बनली आहे. या पक्षांतराच्या लाटेमागे केवळ भाजपाचे आकर्षण हेच एकमेव कारण नसून, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांचा कार्यकर्त्यांशी वागण्याचा स्वभाव आणि त्यांची कार्यशैलीही काही प्रमाणात जबाबदार असल्याचे जाणकार राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. प्रदेशाध्यक्षांच्या स्वतः च्या जिल्ह्यात पक्षाचे हे विघटन काँग्रेससाठी मोठी नामुष्की ठरत आहे. त्याचबरोबर महायुती सरकार आणि चिखली विधानसभा मतदारसंघात आमदार श्वेता महाले पाटील यांच्या नेतृत्वात सुरू असलेला विकास व शहर व ग्रामीण दोन्ही ठिकाणी आमदार सौ श्वेता महाले पाटील यांच्याकडून सुरू असलेली विकास कामे यामुळे प्रभावित होऊन आपला कल विकाससोबत असल्याचे, त्याचबरोबर देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व व महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या विकासावर देश शिक्कामोर्तब करत असताना देशासोबत राहण्याचे आपण मान्य करत असल्याचे व त्यामुळेच भाजपामध्ये प्रवेश करत असल्याचे प्रवेशित म्हणाले. या सोहळ्यास चिखली नगर परिषदेचे अध्यक्ष मा. पंडितदादा देशमुख, शहराध्यक्ष सागर पुरोहित, तालुका अध्यक्ष डॉ. कृष्णकुमार सपकाळ, अमडापूर मंडळ अध्यक्ष अमोल साठे, सुधीर तांबट, नगरसेवक दीपक खरात, अनिल सपकाळ, गजानन पवार, सचिन गरड यांच्यासह गजानन परिहार, धनंजय भगत, विजय वाळेकर (शहराध्यक्ष, युवा मोर्चा), सागर वायाळ, अच्युतराव रिंढे पाटील आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते

# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सोमवारी

**जनसंचलन/बुलढाणा**

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने मार्च महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे. पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे. महिला लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पीडित महिलांनी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावेत. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. लोकशाही दिनामध्ये महिलांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, न्यायप्रविष्ट, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले निवेदन स्वीकारले जाणार नाही. समस्याग्रस्त व पीडित महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




# भरधाव ट्रक समोरच्या ट्रकवर धडकला; दोघे ठार

**जनसंचलन/बुलढाणा**

टाइल्सची वाहतूक करणाऱ्या ट्रकने समोरील बकऱ्या घेऊन जाणाऱ्या ट्रकला धडक दिल्याने एकाचा जागीच, तर दुसऱ्याचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला. ही घटना अकोला मार्गावरील वरखेडनजीक शुक्रवारी (दि. १३) सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास घडली. या अपघातात चार बकऱ्यांचा मृत्यू झाला. प्राप्त माहितीनुसार, बकऱ्या वाहून नेणारा ट्रक खामगावहून अकोल्याच्या दिशेने जात होता. त्याचवेळी टाइल्सने खामगाव-अकोला मार्गावर अलीकडील काळात अपघाताचे प्रमाण वाढले भरलेल्या भरधाव ट्रकने समोरील ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अपघातात इकबाल अली खान (२२, रा. नयना, किशनगड, राजस्थान) यांचा जागीच मृत्यू झाला, तर मोसम खान अशरूप खान (३२, रा. डवका, किशनगड, राजस्थान) यांचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला. त्याचवेळी ट्रकमधील चार बकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर चार बकऱ्या गंभीर जखमी झाल्याचे समजते. घटनेची माहिती पोलिस मिळताच घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने मृतदेह खामगाव येथील सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले.

# गोठ्यातून १६ क्विंटल तूर चोरीला !

**जनसंचलन/मलकापूर**



तालुक्यातील अनुराबाद शिवारात एका शेतकऱ्याच्या गोठ्यातून अज्ञात चोरट्यांनी ७३ हजार ६०० रुपये किमतीची १६ क्विंटल तूर लंपास केल्याची घटना १३ मार्च रोजी उघडकीस आली. याप्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. मयुर राजेंद्र नारखेडे (वय २१, रा. अनुराबाद) या तरुण शेतकऱ्याने शेतातील तुरीची मळणी करून पीक घरात आणले होते. त्यांनी अंदाजे ४० क्विंटल तूर युरियाच्या ८० गोण्यांमध्ये भरून गावाशेजारील त्यांच्या मालकीच्या वाड्यातील पत्र्याच्या खोलीत ठेवली होती. दरम्यान, १२ मार्च रोजी सायंकाळी ६:३० ते १३ मार्च रोजी सकाळी ७:०० वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी वाड्याच्या मागील बाजूने लोखंडी पत्रे वाकवून आत प्रवेश केला व त्यातील १६ क्विंटल तूर चोरून नेली. याप्रकरणी मयुर नारखेडे यांच्या फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरूद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ व ३३४ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक दीपक राठोड करीत आहेत. दरम्यान, शेतकऱ्यांच्या शेतातील साहित्य व शेतमाल चोरीला जाण्याच्या घटना जिल्ह्यात वाढल्या आहे. टोळीचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

# चिखलीच्या जयस्तंभ चौकात भीषण आग; ५-६ दुकाने जळून खाक!



**जनसंचलन/बुलढाणा**

शहरातील मध्यवर्ती जयस्तंभ चौक परिसरात आज अचानक भीषण आग लागल्याने मोठी खळबळ उडाली. या आगीत तब्बल पाच ते सहा दुकाने जळून खाक झाली असून व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, जयस्तंभ चौकातील बैलगाडी बागवानांच्या फळांच्या दुकानांसह एक घड्याळाचे दुकान आणि इतर काही लहान व्यावसायिकांची दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात धुराचे लोट पसरले आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाची एक गाडी तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. विशेष म्हणजे सामाजिक कार्यकर्ते गोपाल देव्हडे यांनी स्वतः अग्निशमन दलाची वॉटर गन हातात घेत आग विझवण्यासाठी धाडसी मदत केली. त्यांच्या या कृतीचे उपस्थित नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. दरम्यान, या भीषण आगीचे गांभीर्य लक्षात घेता परिसरातील दुकानदार आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी गर्दी केली होती. सुदैवाने आगीत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही; मात्र अनेक दुकाने जळून खाक झाल्याने व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच लोकप्रतिनिधी कुणाल बोन्द्रे, काशिनाथ बोन्द्रे, सुरेंद्र ठाकूर, सुहास शेटे यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच प्रशासनाकडून तातडीने मदत मिळावी, अशी मागणीही स्थानिक व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे घटनास्थळापासून अवघ्या सुमारे २०० मीटर अंतरावर बोंद्रे पेट्रोल पंप असल्याने मोठा अनर्थ टळल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. आग नेमकी कशामुळे लागली याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळालेली नसून प्रशासनाकडून तपास सुरू आहे.

# संसदेचा अवमान प्रकरणी बुलढाण्यात भाजपाचे आंदोलन; राहुल गांधींचा तीव्र निषेध



**जनसंचलन/बुलढाणा**

भारतीय संसदेचा अवमान केल्याचा आरोप करत भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी बुलढाण्यात काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्या विरोधात जोरदार आंदोलन करत तीव्र निषेध व्यक्त केला. १२ मार्च रोजी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान संसद परिसरात काँग्रेस नेत्यांनी ङ्कचहा-बिस्कीट पार्टीफ करत संसदेच्या पवित्रतेचा अवमान केल्याचा आरोप भाजपाकडून करण्यात आला. लोकसभा अध्यक्षांनी मकर प्रवेशद्वाराजवळ आंदोलनास मनाई केली असतानाही काँग्रेस खासदारांनी तेथे बसून संसदीय नियमांची पायमल्ली केल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या पार्श्वभूमीवर बुलढाणा येथे भाजपा जिल्हाध्यक्ष मा. आ. विजयराज शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस देशातील गॅस टंचाईबाबत खोटा प्रचार करून जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार प्रत्येक नागरिकाला ऊर्जा व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या आंदोलनात दत्ता पाटील, मंदार बाहेकर, डॉ. राजेश्वर उबरहंडे, चंद्रकांत बर्दे, डॉ. मधुसूदन सावळे, योगेश राजपूत, अभिमन्यू करपे, वर्षाताई पाथरकर, अजित गुळवे, प्रतीक गायकवाड यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# तुटलेल्या विजेच्या तारेमुळे शेतकऱ्याचा शॉक लागून मृत्यू

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**



वजेच्या तुटलेल्या तारेमुळे एका शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना आज सकाळी आळंद फाटा परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत असून वीज वितरण यंत्रणेच्या हलगर्जीपणावर संताप व्यक्त केला जात आहे. मृत शेतकऱ्याचे नाव अश्रुबा ज्ञानबा घुले (वय ५५, रा. खापरखेडा, ता. लोणार, जि. बुलढाणा) असे आहे. घुले हे मागील पाच ते सात वर्षांपासून आळंद येथे आपल्या नातेवाईकांकडे राहत होते. त्यांनी आळंद (ता. देऊळगाव राजा) परिसरातील शेती ठोका बटईने घेतली होती आणि शेतीकाम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. मळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी सुमारे साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घुले हे आपल्या शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी गेले होते. मात्र शेताच्या वरून गेलेली वीजवाहिनी अचानक तुटून शेतात पडलेली होती. पाण्याच्या कामासाठी शेतात जात असताना त्यांचा त्या तुटलेल्या विजेच्या तारेस स्पर्श झाला आणि तीव्र विजेचा शॉक बसून त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्घटना आळंद फाटा येथील गणपती मंदिराजवळील शेतात घडली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. स्थानिक नागरिकांनी वीज वितरण कंपनीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले असून तुटलेल्या व धोकादायक विजेच्या तारा वेळेत दुरुस्त न केल्यामुळे निष्पाप शेतकऱ्याचा जीव गेला, असा संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित विभागाने या घटनेची तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मृत अश्रुबा घुले यांच्या पश्चात एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार असून त्यांच्या निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८